"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

## बांधकाम / विद्युत विभाग

**जा.नं. मनपा/साबां.वि./**क्र.आ.१/२२७७/२०२६-२७ **दि.** २५ / ६ **/2026**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** प्रेस नोट प्रसिध्द करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कोणत्याही इमारती, व मालमत्ता ठिकाणी गैरवापर, मालमत्तेचे नुकसान करणे, कचरा व घाण करणे, मनपाच्या सदनिका परस्पर भाड्याने देणे याबाबत चौकशी करून संबधित एजन्ट व कसुरदार यांचेवर गुन्हे दाखल करणे बाबतची प्रेस नोट सोबत जोडली आहे. सदर प्रेस नोट दोन दिवसात राज्य स्तरीय वृतपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. प्रेस नोट प्रसिध्द झाल्यानंतर सदर वृतपत्राचे कात्रण मुख्य कार्यालयातील नोटीस बोर्डावर तसेच सर्व प्रभाग कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात यावीत ही विनंती.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. यांचे कडील भाडेतत्वावरील इमारती मधील सदनिका ह्या विविध प्रकल्पातील बाधितांना भाडेतत्वार तसेच पर्यायी व्यवस्था अंतर्गत संक्रमण शिबिराकरीता देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेस परवडणारी घरे अंतर्गत दोन इमारती बांधून विकासकाकडून हस्तांतरीत झाल्या आहेत. सदर इमारती मधील सदनिका पात्र रहिवाशांना देण्यात येत आहेत.

सदर इमारती मधील रहिवाशांकडून इमारती मधील लिफ्ट, पाण्याचे पंप, दरवाजे, खिडक्या, विद्‌युत व्यवस्था या ठिकाणी नासधुस होत असल्याचे प्रकार तसेच कचरा फेकण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत.

पेणकरपाडा येथील कक्कड हाऊसिंग या विकासकामार्फत परवडणारी घरे या योजनेतून इमारत बांधून त्यामधील 202 सदनिका महानगरपालिकेस हस्तांतर केल्या आहेत. त्यामधील काही सदनिका महानगरपालिकेच्या पात्र सफाई कामगारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमश्राफल्य योजनेतून कायम स्वरूपी हस्तांतर केल्या असून इतर सदनिका रिकामी आहेत. सदर इमारतींची देखभाल व दुरूस्ती, सफाई मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

सदर इमारतींची स्थळ पहाणी दि.23 जुन 2026 रोजी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी समक्ष केली असता सदर इमारती मधील लिफ्टची तोडफोड करून नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. मा. आयुक्त यांनी या प्रकरणाबाबत तात्काळ चौकशी करून संबधितांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्यानुसार सदर इमारती मधील सदनिका क्र.407 मध्ये राहणारे श्री. अर्जुन आदिमलम यांच्यावर काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा क्र.825/2026 नोंदविण्यात आला आहे. सदर व्यक्तीकडून झालेली नुकसान रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले आहे.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या कोणत्याही इमारती, व मालमत्ता ठिकाणी गैरवापर, मालमत्तेचे नुकसान करणे, कचरा व घाण करणे, मनपाच्या सदनिका परस्पर भाड्याने देणे याबाबत चौकशी करून संबधित एजन्ट व कसुरदार यांचेवर गुन्हे दाखल करणे बाबतचे आदेश मा. आयुक्त यांनी दिले आहेत.

PC-05/26-27/DK/L-12